Indian Journal of Social Sciences and Literature Studies
Vol. 8, Issue 1, March 2022
ISSN 2349-5634 (Print) ISSN 2455-0973 (online)

# डॉ. अरुणाताई ढेरे यांची काव्यसृष्टी

प्रा. सौ. माधवी महेश पोफळे
क.म. व. श क्षका, मराठी वभाग,
समाजश्री डॉ. प्रशांतदादा हिरे माध्य मक व उच्च-माध्य मक वद्यालय
रावळगाव ता. मालेगाव (ना शक)
प्रा. डॉ. अरुण पाटील
मराठी वभागप्रमुख व संशोधन मार्गदर्शक
म.स.गा. महा वद्यालय, मालेगाव कॅम्प

गोषवारा

स्त्रीवादी साहित्य हा साठोत्तरी कालखंडातील अत्यंत महत्त्वाचा वाड:मयीन प्रवाह आहे. स्त्रीवादी साहित्य धा र्मक, सामाजिक, राजकीय, नैतिक, आ र्थक व भावनिक क्षेत्रात स्त्रियांचे होणारे शोषण हा या वाड:मय प्रवाहाचा केंद्रबिंदू आहे . इ. सन १९७५ नंतरच्या काळात मराठी क वता समृद्ध करणाऱ्या कवयित्री डॉ. अरुणा ढेरे हे एक प्रमुख नाव आहे. जन्माला आलेल्या प्रत्येक स्त्रीला जीवनात मुलगी, पत्नी, आई, सून, सासू अशा वेगवेगळ्या भू मका पार पाडाव्या लागतात. पुरुषसत्ताक समाजाने स्त्रीला कोणत्याही प्रकारचे निर्णय स्वातंत्र्य दिलेले नाही. स्त्री ने कुटुंबासाठी स्वतःचे अस्तित्व वसरून दुसऱ्याची सेवा - सुश्रुषा करणे एवढेच तिचे कार्य आहे. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात शक्षणामुळे स्त्रियांच्या चळवळी त्यांचे अनुभव वश्व स्त्रीस्वातंत्र्याचा स्वर जोरकस होताना दिसतो. स्त्रियांवरील अन्याय अत्याचारा वरुद्ध जनमत होताना दिसते.

डॉ. अरुणा ढेरे यांचा परिचय

मराठी साहित्यात वशेष दमदारपणे आ ण प्रगल्भ चंतन करून व वध वाड:मयामध्ये नि र्मती करणाऱ्या लेखकांमध्ये डॉ. अरुणा ढेरे यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. आज वयाच्या मध्यबिंदूवर उभ्या असलेल्या डॉ. अरुणा ढेरे साहित्याच्या अनेक शाखांत प्रवेश करून वेगवेगळ्या पद्धतीचे लेखन समर्थपणे करताना दिसतात . त्यांचे एक मोठे वै शष्ट्य असे की त्या एका बाजूला काव्यात्म चंतनशील भू मकेत रमतात तर दुसऱ्या बाजूला जीवनाचा वेगवेगळ्या अंगांनी शोध घेणाऱ्या ले खकेच्या रूपात आपल्यासमोर येतात. डॉ. अरुणा ढेरे यांच्या कार्याचे स्वरूप पाहता १९८३ ते १९८८ या काळात पुणे वद्यापीठाच्या शैक्ष णक माध्यम संशोधन केंद्रात अध्यापक नि र्मती म्हणून काम केले आहे १९८९ ते १९९१ या काळात राज्य शक्षण शास्त्र संस्थेत साहित्य वभाग प्रमुख म्हणून कार्यरत आ ण 'पसाय' या मा सकाची संपादिका म्हणून काम केले आहे . त्यानंतर त्या पूर्णवेळ लेखन व संशोधन कार्य करीत आहेत.

साहित्य अकादमी पारितो षक वजेते भारतीय संस्कृती, प्राचीन साहित्य इत्यादींचे व्यासंग असलेले ज्येष्ठ साहित्यिक डॉ. रा. चं. ढेरे यांच्या कडून साहित्याचा वारसा प्राप्त झालेला.

डॉ. रा. चं. ढेरे यांची कन्या अरुणा ढेरे यांना बालपणापासून साहित्याचे आ ण समीक्षेची वैचारिक पार्श्वभूमी लाभली आहे . लहानपणापासूनच व डलांचा व्यासंगी श्वास लाभल्याने त्यांनी समाजशास्त्र, मानसशास्त्र इत्यादी साहित्याशी निग डत शास्त्रांचा आवश्यक तो अभ्यास केला. तसेच वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, जैन, बौद्ध धर्मग्रंथ यांच्याशीही ओळख करून घेतली . दंतकथा, मथके यांचेही महत्त्व अभ्यासले, डॉ. अरुणा ढेरे यांच्या कार कर्दीचा वचार केला तर कवयित्री, कथा, कादंबरी, ल लत लेख, अनुवाद, समीक्षा, लोकसाहित्य वषयक सामाजिक इतिहासपर तसेच कशोरांसाठी व कुमारांसाठी लेखन असे सर्व वाड:मय प्रकार त्यांनी हाताळले.

स्त्रीत्वाची संवेदनशीलता

व वध वाड्मय क्षेत्रांमध्ये नि र्मती करणाऱ्या ले खका डॉ. अरुणा ढेरे यांचे प्रारब्ध यक्षरात्र, निरंजन, मंत्राक्षर, जावे जन्माकडे, निळा पारदर्शक अंधारात हे त्यांचे क वतासंग्रह असून यक्षरात्र निरंजन मंत्राक्षर या क वतासंग्रहांना व वध पुरस्कार प्राप्त झालेले आहे.

मंत्राक्षर क वता संग्रहामध्ये लहान मुलींपासून नथवर तरुणी व संसारी स्त्रियांपासून वधवा परित्यक्ता व वृद्ध स्त्रियांच्या भाव वश्वाचे चत्रण डॉ. अरुणा ढेरे यांनी केले आहे. आदिबंध मथकांचा वापर करून आधुनिक स्त्रीच्या दुःखाचा वेध त्यांनी घेतला आहे. या स्त्री चत्रणामध्ये वास्तवता आहे. मुलीचे भ वष्य वेगळे पाहणारी आई त्यांनी पाहिली आहे स्त्रीच्या स्वचे अस्मितेचे केंद्र म्हणून आदिबंधात्मक घराची कल्पना आली आहे .

१९९० नंतरच्या कवयित्रींमध्ये डॉ. अरुणा ढेरे यांचे काव्यलेखन वै शष्ट्यपूर्ण आहे मंत्राक्षर व निरंजन क वता संग्रहातील क वतांमधून स्त्री जा णवांचे जाणते समंजस आ वष्करण झाले आहे. स्त्री जा णवेतील आत्मभान आ ण समाजभान सतर्कतेने मांडले गेले आहे. प्रचारकी थाट नाही आक्रस्ताळा शब्दप्रपंच नाही लोकरंगातून आदिबंधनातून पौरा णक मथकातून ग्राम भू मकेतून महानगरीय चक्रातून स्त्री जा णवांचे व वध पदर स्वाभा वकतेने आ वष्कृत करताना स्त्रीवादाचे अ धसूचन झाले आहे .आधुनिक साहित्यात येणारे स्त्रीवादाचे काटे कंगोरे निकष रागरंग अरुणा ढेरे यांच्या निरंजन आ ण मंत्राक्षर मधील क वतेस लावता येणार नाहीत.

त्यांच्या क वतांमधून स्त्रीवादाचा समर्थ पण स्वतंत्र वचार उच्चार आढळतो. स्त्रीवादी असल्याच्या मर्यादा कंवा अन्यायाचा गळेकाढू आकांत कंवा बंड करण्याची प्रवृत्ती, बंधने तोडण्याचा आग्रह यात कुठल्याही टोकाच्या परिणामाला त्यांची क वता जात नाही. मानवी नातेसंबंधांची जाण स्त्री-पुरुष प्रेमाचे प्रगल्भ दर्शन निसर्ग व माणूस यांच्या संबंधांची अ भव्यक्ती करणारी त्यांची क वता आहे. स्त्रीकेंद्रित अ भव्यक्ती स्त्री वश्वाच्या प्रतिमा, प्राचीन स्त्री मथके या सगळ्यांमधून आधुनिक स्त्रीचे चत्र त्या रेखाटतात. परिस्थिती वरोधात बंड करणारी बंडखोर स्त्रीवादी क वता त्यांनी लहिली नसली तरी स्वतःवर ठाम वश्वास असणाऱ्या आधुनिक स्त्रीच्या भाव वश्वाला त्यांनी समर्थपणे पुढे आणले आहे. त्यांनी रेखाटलेली स्त्री शांत, संयमी असली तरी आपला ठाव स्वा भमान न सोडणारी आहे म्हणूनच स्त्रीवादाचा एक वचारी व समर्थ उच्चार त्यांच्या काव्यामध्ये दिसून येतो.

स्त्रियांच्या काव्य भाषेतील बदल

अलीकडे स्त्रियांच्या क वता वाचतानाही येत यातील भा षक वेगळेपण वाचकाच्या मनावर ठसते. १९८० नंतर स्त्रीवादी वचाराचा रेटा जसजसा वाढत गेला तसतशी स्त्रीयांची क वता पारंपारिक भावूक रोमॅण्टिक शैलीच्या पकडीतून मुक्त होऊ लागली इतकी स्त्रीवादी वैचारिक धारणा नसलेल्या कवयित्रींची भाषाशैली व प्रतिमासृष्टीही बदलतांना दिसू लागली. उदा.दाखल अरुणा ढेरे यांच्या नामनिराळा या क वतेतील ही प्रतिमा पहा - बलात्काराला सज्ज झालेल्या पुरुषासारखा शब्द उभा तिच्यासमोर एकट्या संध्याकाळी अचानक.......

स्त्री साहित्यातील स्वप्नसंवेदन आ ण स्वप्न संजीवन

खरेतर स्वप्न पडणे हा एक सर्वसामान्य अनुभव असतो त्यामुळेच काही अंशी तो वास्तवाचाही अंश असतो तरीही स्त्री काव्यावर स्वप्न रंजनाचा आक्षेप समीक्षकांनी घेतलेला आढळतो. चोवीस तास स्वप्न पाहणे हे एक वेळ खटकणारे ठरेल, पण स्वप्न पाहणे म्हणजे रोमांटिक असणे, पलायनवादी असणे अशा प्रकारचे निष्कर्ष काढणे कतपत योग्य आहे? मानवी संस्कृतीचा वकासच मुळी भव्य उदात्त स्वप्ने पाहण्यातून झालेला आहे .

ज्ञानपीठ पुरस्कार मळालेल्या बांगला भाषेतील माननीय ले खका महाश्वेतादेवी यांनी आपल्या एका भाषणात केलेले एक वधान या ठिकाणी नमूद करावेसे वाटते स्वप्न पाहण्याचा अ धकार हा मूलभूत अ धकार असला पाहिजे स्वप्नांसाठी स्त्री मनामध्ये असणारी कोवळीक अरुणा ढेरे यांच्या क वतांमध्ये हळुवारपणे टिपली गेली आहे. स्त्रीची सनातन व्यथा जात्यावरील ओव्या यांच्या सुरात गुंफून त्या लहितात .....

दुडीवर दुडी ,बाई पाणोठयाला येते,
पाणोठ्याला नव्हे, बाई माहेराला येते.
संथ हले पाणी, स्वप्न बुडते बुडते,
चंद्र गाण्यात आला, की बाई
मरण मागते बाई मरण मागते (मंत्राक्षर)

कवयित्रीचा व्यासंग

ऐंशीच्या दशकात नावारूपाला आलेल्या आ ण चाळीस वर्षे सातत्याने क वता व अन्य लेखन करणाऱ्या कवयित्री आ ण ले खका अरुणा ढेरे यांच्या सहा संग्रहांमधून एकशेतीस क वता वेचणं ही नीरजा साठी कसोटीच होती ,ती त्यांनी उत्तमरीत्या पेलली देखील.

नीरजा या कवयित्री असल्यानं क वतेमागची नि र्मतीप्र क्रया, काव्यप्रवास, कवीच्या ने णवेतली अस्वस्थता, स्वप्नरंजन, वास्तवता, प्रतिमासृष्टी, भाषाप्रयोग इत्यादी क वता संबं धत घटकांशी परि चत आहेत. या व यांसारख्या घटकांचे त्यांनी केलेले ववेचन मर्मग्राही झाले आहे. प्रस्तावनेत 'सर्जनाचा शोध', 'तू आ ण मी' वषयी, 'स्त्री वषयक क वता', 'स्वकडून सम्यकभानाकडे जाणारी क वता' आ ण 'प्रतिमासृष्टी' ही आशयसूत्रे घेऊन त्यांनी अरुणाताईंचा काव्यप्रवास उलगडला आहे. या सूत्रांवर केलेले भाष्य म्हणजे आस्वादक समीक्षेचा नमुना आहे. उदा. 'सर्जनाचा शोध' या आशयसूत्रात, 'आपल्या आत असलेल्या उबेनं कोणतीही मादी जशी जीव निर्माण करत असते तसंच काहीसं क वतेचं असतं. आपल्या आंतरिक जगात उसळलेल्या कल्लोळाच्या धगीतून निर्माण होणाऱ्या शब्दांचीच क वता होत असते'. क वतेचं आ ण कवयित्रीचं एकजी वत्व असे व्यक्त होते.

कवीच्या लेखनात त्यानं अनुभवलेला, पाहिलेला, ऐकलेला, कल्पिताचा आधार घेऊन रंगवलेला काळ येतो. अरुणाताईंना बालपणापासून लाभलेला पुस्तकांचा सहवास व मळालेलं लोकसंस्कृतीचं बाळकडू, आदिबंधात्मक समीक्षेवर त्यांनी केलेले काम आ ण संशोधनात्मक लेखनाची आवड या साऱ्याचा परिणाम त्यांच्या काव्यावर झाला. जगण्याकडे समंजसपणे पहात स्वतःला आ ण परंपरांना तपासण्याचं काम त्यांच्या काव्यातून होत राहिलं. त्यांचा पंड आक्रमक नव्हता, पण स्त्रीचं शोषण त्या पोटतिडकीनं मांडतात. आजूबाजूच्या कोलाहलातही माणसामाणसांतील सौहार्द आ ण प्रेमावर आधारलेले नातेसंबंध यांच्यावरचा वश्वास जपून ठेवतात. हा त्यांचा व स्वाभा वकच त्यांच्या क वतेचा स्वभावगुण नीरजा यांनी सुंदर उलगडला आहे.

अरुणा ढेरे यांची क वता म्हणजे एकात एक मसळलेल्या अनेक आशयसूत्रांचा कोलाज असते. तो तयार करताना कवी म्हणून फार मोठी उंची गाठावी लागते. एकाच वेळी नि र्मतीप्र क्रया, सर्जनशोध, नातेसंबंध, बाईचं जगणं इत्यादी अनेक स्तरांवरचे अनुभव एकत्रित मांडण्याची कला फार कठीण; पण ही कवयित्री ते वारंवार करते. क वतेतील कालावकाश रूपकात्मक करणं आ ण प्रतिमासृष्टी व वधांगी मांडणे, हे दुहेरी ' वणकाम' ही कवयित्री करते. या वणकामातलं सौंदर्य आ ण कौशल्यं नीरजा हळुवार उलगडतात व अधोरे खत करतात.

आजची कवयित्रींची क वता आ ण त्यातील स्त्रीवाद याची बरीच चर्चा होते. अरुणाताईंच्या मते, 'आजच्या स्त्रीला पुरुष हवा आहे. जो तिला, तिची अपरिहार्य ओढ, तिचं कोसळणं, धापत धावणं समजून घेणारा आ ण लढण्याचा वश्वास देणारा असा मत्र हवा आहे. त्याचं हे अतिशय तरल पण आत्मनिर्भरतेनं परिपूर्ण चत्र ही आजची गरज आहे'. ही गरज त्या अनेक क वतांतून अधोरे खत करतात.

एकूणच स्वकडून सम्यक भानाकडे जाणारी आ ण वश्वाशी संवाद साधत वसंवादी सूर दूर सारणारी अरुणाताईंची क वता आहे. .

संदर्भ सूची-

राा.ग. जाधव आधुनिक मराठी कवयित्रींची क वता, प्रतिमा प्रकाशन

डॉ. सुषमा दाते जगण्याचा खोल तळाशी, उन्मेष प्रकाशन